# प्रकरण चौथे

# सभापती, सदस्या, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलाखतीचा गोषवारा

## प्रकरण चौथे

## सभापती, सदस्या, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलाखतींचा गोषवारा

**१) महिला व बालकल्याण समितीच्या सभापती**

**२) महिला व बालकल्याण समितीच्या महिला सदस्या**

**३) जिल्हा परिषदेतील महिला सदस्या**

**४) महिला व बालकल्याण समितीचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी**

**५) महिला व बालकल्याण समितीचे कर्मचारी**

महिला व बालकल्याण समितीच्या कार्यक्रमाच्या विविध योजनेच्या १०० महिला लाभार्थीच्या मुलाखतीनंतर हा कार्यक्रम तसेच त्यातील वेगवेगळया योजना यांच्या अंमलबजावणीत प्रत्यक्षपणे ज्यांचा संबंध येतो, अशा वरील पदाधिकारी, सदस्या, अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्याकडून अंमलबजावणीबाबत माहिती प्राप्त केली. अंमलबजावणी प्रक्रियेत त्यांना अडचणी कोणत्या आल्या ? व त्या कशा सोडविल्या ? अशा प्रकारे या कार्यक्रमाबद्दलचा त्यांचा दृष्टीकोन जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

लाभार्थींना विचारलेल्या प्रश्नाचा या मुलाखतीमध्ये समावेश करण्यात आला. त्यानुसार पदाधिकारी, सदस्या, अधिकारी व कर्मचारी यांची मुलाखत घेण्यात आली. मुलाखतीची खालील घटकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे.

*१) महिला व बालकल्याण कार्यक्रम दृष्टीकोन, कार्यवाही अडचणी इत्यादी.*

*२) योजनांची प्रक्रिया व कामकाज.*

*३) योजनांचे लाभ व सर्वसाधारण दृष्टीकोन.*

वरील मुद्यांच्या आधारे पदाधिकारी, सदस्या, अधिकारी व कर्मचारी यांची मुलाखत घेण्यात आले. या मुलाखतींचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## १) महिला व बालकल्याण कार्यक्रम :–

१९९२ साली जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकल्याण समिती या स्वतंत्र विषय समितीची निर्मिती झाली. महिला व बालकल्याण समितीच्या निर्मितीपूर्वी म्हणजे १९९२ पूर्वी व १९९२ नंतरचा कार्यक्रमाचा वर्गीकरण केले असता समितीच्या स्थापनेमुळे महिला व बालकल्याण कार्यक्रम अधिक गतीशील झाला असल्याचे, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांनी म्हटले. कारण समितीच्या स्थापनेपूर्वी असे कार्यक्रम राबविल्याची त्यांना माहिती नाही लाभार्थीची संख्या ही फारच कमी होती.

महिला व बालकल्याण समितीच्या कार्यक्रमामुळे जिल्हयातील प्रत्येक गावात लाभार्थी आढळून आले. मग तो गाव मोठा असो, की लहान असो, वाडयावस्त्यातील गावात ही लाभार्थी असल्याचे दिसून आले. या समितीच्या स्थापनेमुळे महिला व बालकल्याण कार्यक्रम ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर तळागाळातील ग्रामीण भागात हा कार्यक्रम पोहोचल्याचे आमच्या सर्वेक्षणातून दिसून आले.

निम्यापेक्षा जास्त लाभार्थीना सभापती कोण आहे हे माहित नाही याबद्दल महिला सभापतीना विचारले असता त्यांनी असे मत व्यक्त केली की, ग्रामीण भागातील महिला लाभार्थी योजनेच्या कागदपत्रासाठी, योजना मंजूरीसाठी किंवा योजनेतील वस्तू आणण्यासाठी स्वतः येत नाहीत तर घरातील पुरुष मंडळीच योजनेच्या मंजूरीसाठी आमच्याशी संपर्क साधतात व वारंवार जिल्हा परिषदेला येतात त्यामुळे असे उत्तर येण्याची शक्यता असेल, असे सांगितले. त्यानंतर योजनेच्या मंजूरीसाठी जास्त लाभार्थी सभापती मदत करत नाही असे सांगितले याबद्दल आपले मत काय आहे? अशी सभापतीशी विचारणा केल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, लाभार्थी महिला हया एकाच भागातील नाहीत. आपण सर्वेक्षणासाठी निवडलेल्या काही महिला आपल्या मतदारसंघाच्या जवळच्या किंवा मतदारसंघातील आहेत. समिती सदस्यांची संख्या आठ इतकी आहे. त्यामुळे समिती सदस्यांचे मदतीचे प्रमाण जास्त असू शकते. जर प्रत्येक सदस्यांच्या वैयक्तिक मदतीचे वर्गीकरण केल्यास सभापतीनी मदत जास्त केल्याचे प्रमाण कदाचित जास्त येण्याची शक्यता नाकारता येत नाही .

दारिद्रयरेषेखालील कुटूंबातील लाभार्थीची संख्या निम्यापेक्षा जास्त आहे. त्यात अनुसूचित जातीतील लाभधारकाची संख्या जास्त आहे. शासनाच्या धोरणानुसार दारिद्रयरेषेखालील महिलांसाठी व सर्वसाधारण घटकांसाठी स्वतंत्रपणे अनुदानाची व्यवस्था केली जाते. या कार्यक्रमांच्या बऱ्याच लाभधारक महिलांना हा कार्यक्रम निटसा माहित नाही, असे सर्वेक्षणात आढळले. महिला व बालकल्याण सभापतीकडे याचे स्पष्टीकरण मागितले. त्यावर त्यांनी सांगितले की, कार्यक्रमाची सखोल माहिती जाणून घेणे ही तांत्रिक बाब आहे व त्यामुळे ग्रामीण महिलांकडून हा कार्यक्रम सविस्तर माहित असण्याची अपेक्षाही नाही. या कार्यक्रमात योग्य लाभधारकांना योग्य लाभ मिळवून देणे, हा उद्देश असल्यामुळे त्यादृष्टीने समिती प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कागदपत्रांची येणारी अडचण सोडविण्यासाठी सभापती पुढाकार घेत नाही असे लाभार्थीनी सर्वेक्षणात सांगितले आहे. यावर सभापती असे स्पष्टीकरण देतात की, कागदपत्रांची अडचणही तांत्रिक स्वरुपाची असल्याने मदत करता येत नाही.

महिला व बालकल्याण असे समितीचे नाव असताना देखील महिलांसाठी राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाच्या तुलनेत बालकल्याण कार्यक्रमांकडे दुर्लक्ष झाले असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले असता त्यांनी असे स्पष्टीकण दिले की, एकात्मिक बालविकास कार्यक्रम हा राष्ट्रीय स्तरावरुन चालवला जाणारा बालकांसाठी असणारा कार्यक्रम जिल्हा परिषदेद्वारा स्वतंत्रपणे राबविला जातो. यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची ही तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे महिला व बालकल्याण समितीच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर हा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. त्यामुळे समितीच्या माध्यमातून बालकल्याण कार्यक्रम काही कमी प्रमाणात राबविले जातात. यासंबंधी महिला सदस्यांना विचारले असता त्यांनी कार्यक्रमांची व्याप्ती व अनुदानात वाढ करावी म्हणजे कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविला जाईल, असे सांगितले आहे.

महिला व बालकल्याण समिती सदस्या व सभापती मिळून मिसळून वागत नाही असे सर्वेक्षणात आढळून आलेले आहे. याबद्दल सभापती व समिती सदस्या यांनी असे स्पष्टीकरण दिले की, समितीच्या लाभासाठी जिल्हा परिषद सदस्यांची शिफारस

घ्यावी लागते. त्यामुळे लाभार्थीचा जिल्हा परिषद सदस्यांशी जास्त संपर्क येतो या कारणाने त्यांना असे वाटत असल्याचे मत व्यक्त केले.

## २) योजनांची प्रक्रिया व कामकाज :—

जिल्हा परिषदेच्या धोरणानुसार एका योजनेचा लाभ घेतल्यानंतर दुसऱ्या योजनेचा लाभ घेता येत नाही. परंतू महिला व बालकल्याण समितीच्या काही लाभार्थीनी एकापेक्षा अधिक योजनांचा लाभ घेतल्याचे संशोधनात आढळून आले यासंबंधी उपमुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, एकापेक्षा अधिक योजनांचा लाभ एका लाभार्थीने घेणे नियमबाहय आहे, परंतू ग्रामपंचायतीच्या शिफारसीनुसार लाभधारकांचे प्रस्ताव स्वीकारले जातात. त्यामुळे संबंधित लाभधारकाने अगोदर लाभ घेतला आहे काय? याबाबत तपासणी होत नाही. शिवाय प्रतिवर्ष जिल्हा परिषदेच्या लाभार्थीच्या संख्या हजारोने असते. त्यातून पूर्वी लाभ घेतले त्याचे नाव शोधणे अवघड असते व असा शोध घेणारी यंत्रणाही नाही. त्यामुळे असे लाभधारक आढळू शकतात. याचबरोबर त्यांनी यावर प्रतिबंध करण्यासाठी काही उपाययोजना करण्याचाही प्रयत्न करीत असल्याचे सांगितले.

लाभधारकांच्या सर्वेक्षणावरुन लाभ मिळविण्यासाठी असणाऱ्या योजनेची प्रक्रिया व कामकाज पध्दती जटील असल्याचे जाणवते. या दृष्टीकोनातून समिती सदस्यांना विचारले असता, महिला व बालकल्याण समितीच्या योजनांची प्रक्रिया व कामकाज हे नियमानुसार चालते व योग्य लाभधारक निवडण्याच्या दृष्टीने ते आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या प्रमाणेच महिला व बालकल्याण समितीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांगितले.

प्रस्ताव मंजूरीमध्ये सर्वेक्षणात अधिकाऱ्यांकडून अधिक अडचणी आल्याचे निदर्शनात आले. याबद्दल अधिकाऱ्यांकडे स्पष्टीकरण विचारले असता अधिकाऱ्यांनी असे मत व्यक्त केले की, अधिकाऱ्यांना प्रशासनाची तांत्रिक बाजू नियमानुसार सांभाळावी लागते. त्याचबरोबर लाभासंबंधी असलेल्या पात्रता व तरतूदींचे

नियमानुसार पालन करुन घ्यावे लागते. त्यामुळे काही सुचना केल्या असता अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाते.

प्रामुख्याने आपापल्या मतदारसंघात जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळावा म्हणून महिला प्रतिनिधी प्रयत्नशील असतात, असे महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व अधिकारी, कर्मचाऱ्यांनाही सांगितले. त्यांच्या मते हे स्वाभाविकही आहे वास्तविकतः लोकशाही प्रक्रियेतही प्रतिनिधींकडून आपापल्या मतदारसंघाचा विकास अपेक्षित असतो. तरीही महिला सदस्यांना मात्र लाभधारक निवडण्याच्या व लाभ वाटपाच्या प्रक्रियेमध्ये त्यांना जास्त अधिकार मिळाले पाहिजेत; असे वाटते परंतु याचबरोबर एका प्रश्नाच्या उत्तरादाखल महिला सदस्यांनी या समितीमध्ये जास्तीत जास्त महिला सदस्या असल्यामुळे त्या मुक्तपणे चर्चा करु शकतात व आपले म्हणणे निःसंकोचपणे मांडू शकतात, असे म्हटले.

महिला व बालकल्याण समितीकडून मिळालेल्या लाभवस्तू विकता येत नाहीत परंतु वर्तमानपत्रामध्ये लाभार्थीनी वस्तू विकल्याची बातमीचा संदर्भ महिला व बालकल्याण समितीतील कर्मचाऱ्यांना दिला असता आम्ही या बाबतीत चौकशी करत आहोत, असे उत्तर त्यांच्याकडून मिळाले. तर महिला सदस्यांकडून सांगण्यात आले की, काही लाभधारकांना आवश्यक नसतानाही लाभ मिळतो म्हणून ते लाभ वस्तू विकण्याचा प्रयत्न करतात. अर्थात काहीही असले तरी वरील समस्या ही या कार्यक्रमातील दोष आहे. त्याचे प्रमाण सुदैवाने फार मोठे नाही.

महिला व बालकल्याण समितीचे लाभार्थी हे दारिद्रयरेषेखाली येत असल्याकारणाने त्यांना मिळालेले लाभ वस्तू घरी नेण्यासाठी येणारा खर्च परवडण्यासारखा नाही हा संदर्भ पदाधिकारी, सदस्या, अधिकारी यांना दिला असता, त्यांनी असे उत्तर दिले की, सामान्यतः प्रशासन व लाभार्थी दोघांच्या सुविधेसाठी समिती आपल्या योजनांच्या लाभाचे वाटप तालुक्यांच्या ठिकाणी करते. तर काही मर्यादित योजनांसाठीच लाभार्थीना जिल्हा परिषदेला जावे लागते. सभापती व सदस्यांनी असे सांगितले की, आम्ही पुढील योजनेपासून लाभार्थीना त्यांच्या लाभ वस्तू

ग्रामपंचायत या ठिकाणी किंवा गावाच्या ठिकाणी मिळावी यासाठी योजना आखित आहोत असे सांगितले.

### ३) योजनांचे लाभ व सर्वसाधारण दृष्टीकोन :–

महिला व बालकल्याण समितीकडे एकूण २४ योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक सुची दिली आहे. परंतु कोल्हापूर जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण समितीमार्फत दरवर्षी यातील १० ते १२ योजनाच राबविल्या गेल्याची दिसून येते. याबाबत महिला व बालकल्याण समितीच्या उपमुख्यकार्यकारी अधिकाऱ्याने सांगितले की, आर्थिक निधीच्या अभावामुळे सर्व योजना राबविणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यापैकी महत्वाच्या योजना राबविण्यासाठी समिती प्राधान्य देते. या एकूण योजनांपैकी कोणत्या योजना राबवायच्या हे महिला व बालकल्याण समितिचे सदस्य त्यांच्या बैठकीत ठरवतात. महिला व बालकल्याण समिती सभापती व सदस्यांनीही हेच स्पष्ट केले की, जास्तीच्या योजना राबविणे हे प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने शक्य नाही. म्हणून योजनांची संख्या कमी ठेवून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित केले जाते. मात्र योजनांची निवड करताना स्थानिक परिस्थिती व लाभधारकांच्या मागण्या विचारात घेऊन आर्थिक परिस्थिती व लाभधारकांच्या मागण्या विचारात घेऊन अधिक लाभ मिळवून देणाऱ्या योजनांचा विचार होता.

महिला व बालकल्याण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महिलांना सामाजिक, आर्थिक व राजकीय सबलीकरण करणे हा आहे. हा हेतू साध्य झाला आहे काय ? हे लाभार्थी च्या सर्वेक्षणातून जाणून घेतले असता संमिश्र प्रतिक्रिया मिळाल्या. याबाबत पदाधिकारी महिलांना मात्र लाभार्थींना याबाबत लाभ झाला असल्याचे सांगितले. सभापतींनी आपले मत मांडताना म्हटले आहे की, या महिला व बालकल्याण समितीमुळे अनेक उद्ध्वस्त होणारी घरे वाचली आहेत. अनेक दारिद्रयात खितपत पडलेल्या कुटूंबांना आर्थिक स्त्रोत प्राप्त झाला आहे. प्रामुख्याने विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांना या कार्यक्रमामुळे जीवन जगण्यासाठी आधार मिळाला आहे. याची आम्हाला सर्वेक्षणात देखील प्रचिती आली आहे.

लाभार्थींना लाभ दिल्यानंतर त्या लाभवस्तूचा त्यांनी कसा फायदा घेतला व त्यांच्या सामाजिक आर्थिक भूमिकेवर त्याचा काय परिणाम झाला, याची माहिती समिती घेते का ? याबाबत समिती सदस्यांनी सांगितले की, लाभ दिल्यानंतर लाभधारकांची माहिती घेण्यासाठी अशी कोणतीही यंत्रणा नाही, समितीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही याला सहमती दिली. अर्थात लाभधारकांची माहिती करुन घेण्याची व्यवस्था नसणे ही समितीच्या कार्यपध्दतीची याबाबत मर्यादा असल्याचे दिसते. सभापतींनी मात्र याबाबत सांगितले की, आम्ही माहिती जरी घेत नसलो तरी बरेचसे लाभार्थी नंतर स्वतः येऊन आम्हाला भेटतात व त्यांना झालेल्या फायद्याविषयी वा इतर लाभधारकांना झालेल्या फायद्याविषयी सांगतात.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती, समितीचे सदस्य, जिल्हा परिषद सदस्य तसेच अधिकारी व कर्मचारी हया महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करणाऱ्या तसेच अंमलबजावणीशी निगडीत घटकांच्या प्रतिक्रियांचा सारांश खालीलप्रमाणे देता येईल.

१) महिला व बालकल्याण समिती महिलांचीच असणे उचित आहे. त्यामुळे लाभार्थींच्या प्रस्तावांचा सहानुभूतीपूर्वक विचार होतो. सर्वसाधारणपणे या समितीचा कार्यक्रम व योजनांबाबत दृष्टीकोन लाभधारकांना मदत करणे, त्यांच्यापर्यंत पोहोचणे असा आहे.

२) महिला व बालकल्याण समितीचा उद्देश महिलांचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सहभाग वाढविणे हा असून त्यादृष्टीने त्याची वाटचाल असल्याचे दिसते.

३) महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या काही त्रुटी व मर्यादा आढळल्या.

अ) एकापेक्षा अधिक योजनेचा लाभ घेण्याऱ्या लाभार्थीवर नियंत्रण ठेवता येत नाही.

ब) काही ठराविक योजनाच निधीअभावी राबविल्या जातात.

क) लाभार्थींच्या फायदयाची प्रत्यादान ( Feedback ) घेतली जात नाही.

ड) समिती सदस्यांना ही आपल्या अधिकाराचा पूर्णतः वापर करता येत नाही.

सामान्यतः महिला व बालकल्याण समितीच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाबाबत लाभार्थी महिलांची काहीशी संमिश्र प्रतिक्रिया मिळाली असली तरीही अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून क्रांतिकारी परिवर्तनही अपेक्षित नव्हते. लाभधारक महिलांच्या सकारात्मक दृष्टीकोनात आणि सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टीने सकारात्मक व विकासात्मक परिवर्तनात निश्चितच महिला व बालकल्याण समितीचे यश दडून आहे. प्रामुख्याने जिल्हा परिषदेद्वारे राबविल्या जाणाऱ्या महिला व बालकल्याण कार्यक्रमाचे सिंहावलोकन केले असता अजूनही अयोग्य लाभार्थींची निवड, वस्तूची दर्जा निकृष्ठ, काही महिलांना पुन्हा पुन्हा लाभ वा काही भागातील लाभार्थींचे प्रमाण जास्त, एकाच कुटूंबाना पुन्हा पुन्हा लाभ या अशा बऱ्याच समस्यांना महिला व बालकल्याण समितीस सामोरे जावे लागते, यावरुन असे दिसते की, समितीचे कार्य चांगले असले तरी काही बाबतीत सुधारणेची गरज आहे.

**संदर्भसूची :—**

या प्रकरणात घेतलेली माहिती मुलाखतीच्या माध्यमातून घेतलेली आहे.